# भारताचे संविधान



प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य ;
दर्जाची व संधीची समानता ;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

भारतीय संविधानाचे शिल्पकार
डॉ. बी. आर. आंबेडकर

# निमंत्रण

यू.जी.सी. पुरस्कृत

तुलसी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, तुमसर द्वारा संचालित

## कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय

पेट्रोल पंप, जवाहरनगर, भंडारा (म.रा.)

नॅशनल हायवे क्र.६ - ४४१ ९०६

(नॅक द्वारा Accredited)

(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर संलग्नीत)

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

**''समकालीन लोकशाहीच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांच्या विचाराची प्रासंगिकता''**



**मंगळवार दिनांक १० मार्च २०१५**

**आयोजक**

**डॉ. अजयकुमार मोहबंसी**

संचालक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र

कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय पेट्रोल पंप, जवाहरनगर, त.जि.भंडारा (म.रा.)

E-mail : accjase@rediffmail.com

Contact - Prof. J.V. Kotangle Mobile : 9923483738,9422343684

तुलसी बहुउद्‌देशिय शिक्षण संस्था, तुमसर व्दारा संचालित

# कला - वाणिज्य पदवी महाविद्यालय पेट्रोल पंप ज.नगर (भंडारा)



U.G.C. पुरस्कृत

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र

## जन जागृती अभियान

बंधुनो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आपल्या देशाल तारु शकतात स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही मूल्ये भारताला रुजवून डॉ. आंबेडकरांनी धर्मनिरपेक्षता, लोकशाही , समाजवादाची भक्कम पायाभरणी केली आहे. विज्ञानवाद, निरिक्षरवाद, जडवाद किंवा इहवाद, माणसाच्या कल्याणाचा मूलभूत पाया आहे. हीच विचारसरणी मानवी जिवनाचे खरे तत्वज्ञान असली पाहिजे, अशी डॉ. आंबेडकरांची जीवनाविषयक भूमिका होती.

वर्ण -वर्ग विषमता व स्त्री-पुरुष विषमता नाहीशी झाली पाहीजे, तिचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे त्याशिवाय भारत एकसंघ होणार नाही. भारत बलशाली बनवायचे असेल तर डॉ. आंबेडकरांचे सामाजिक, आर्थिक, राजकिय व शैक्षणिक विषयीचे विचार तनामनात रुजविले पाहीज, हीच आशा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुविचार तनामनात रुजवा व भारताला बलशाली करण्यास मदत करा.

**<u>डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुविचार</u>** :

१) जिथे एकता तिथे सुरक्षितता

२) तुमची मुक्ती तुमच्या हाती

३) 'मानवता' हे धर्माचे दुसरे नाव

४) भाकरीपेक्षा स्वाभीमानाला अधिक महत्व आहे.

५) रोग झाल्यानंतर औषधोपचार करण्यापेक्षा रोगच होणार नाही अशी व्यवस्था करणे अधिक बरे.

६) लोकांच्या राजकिय व सामाजिक जीवनात रक्ताचा थेंब न गळता क्रांतिकारक बदल घडवून आणणे म्हणजे लोकशाही.

७) माणूस धर्माकरिता नाही, तर धर्म माणसाकरिता आहे.

८) समाजाच्या जातीजातीत, गटागटात जो दुरावा आहे, तो लोकशाहीच्या यशाला मारक आहे.

९) सत्याचाच आश्रय करा, दुसऱ्या कोणाला शरण जाऊ नका.

१०) विद्येचे शस्त्र असेल व शील नसेल, तर तो माणूस विद्येच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करेल.

११) विद्या ही तलवारीसारखी आहे, तिचे महत्व तिला धारण करणाऱ्यावर अवलंबून आहे.

१२) प्रसिध्दिची अपेक्षा न करता काम करणारी माणसे पाहिजेत.

१३) आपल्या प्रभावी वक्तव्याने शत्रुचेही मते बदलवू शकतो तोच महापुरुष होय.

१४) राज्यघटना कितीही चांगली असली तरी तीची अंमलबजावणी कोण आणि कसा करतो यावर तिचे यश अवलंबून आहे.

१५) घटना मिळाली, स्वातंत्र मिळाले म्हणजे सर्वकाही संपले असे नव्हे, लोकशाहीचा वृक्ष कोणत्याही मातीत वाढत नाही त्यासाठी ती मुल्यविषयकं जाणीव जोपासली पाहिजे.

१६) आज राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती जनतेच्या मनात एकराष्ट्रायत्वाची भावना निर्माण करण्याची.

१७) विवेकांशी विसंवादी असणारा धर्म कधीही कार्यक्षम होणार नाही.

१८) समतेच्या वागणुकीशिवाय अंगी असलेले गुण कधीही विकास पावणार नाही.

१९) ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला, त्यांच्या उध्दार करणे आपले कर्तव्य आहे., अशी ज्यांना जाणीव आहे ते धन्य होय.

२०) कोणत्याही समाजाची उन्नती त्यांच्या शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून आहे.

२१) आपल्या कर्तव्याची जाणीव टेवून झटून अभ्यास करा.

२२) मनुष्य दिर्घोद्योगाने प्रराक्रमी व बुध्दीमान होऊ शकतो.

२३) ज्याच्या अंगी धैर्य नाही, तो पुढारी होऊ शकत नाही.

२४) आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी रक्ताचा शेवटचा थेंब सांडेपर्यत तयार झाले पाहिजे.

**सौजन्य**

**डॉ. जगजीवन कोटांगले**
समन्वयक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासकेंद्र

**डॉ. जी.डी. टेंभरे**
सचिव, तु.ब.शि.सं.तुमसर
पूर्व सदस्य-विव्दत परिषद रा.तु.म.नागपूर विद्यापीठ

**डॉ. ए. एस. मोहबन्सी**
प्राचार्य
कला व वाणिज्य महा. पे.पंप, जवाहरनगर

'शिका, संघर्ष करा, संघटित व्हा'